# धनिकांनी समाजहितासाठी पुढे यावे : बापट

। पुणे । प्रतिनिधी

समाजातील धनिक लोकांनी समाजहिताच्या कामासाठी योगदान देण्याची गरज आहे, त्यांच्या कार्यातून इतरांना प्रेरणा मिळणार आहे, असे प्रतिपादन पालकमंत्री गिरीश बापट यांनी केले.

फिनोलेक्स इंडस्ट्रीज लि. आणि त्यांचे सीएसआर भागीदार मुकुल माधव फाउंडेशन यांच्या पुढाकाराने येरवडा येथील स्व. भारतरत्न राजीव गांधी रुग्णालय आणि भवानी पेठेतील चंदुमामा सोनावणे प्रसूतिगृह येथे नवजात अर्भकांसाठी दोन अतिदक्षता विभाग उभारण्यात आले आहेत. या विभागाचे उद्घाटन बापट यांच्या हस्ते झाले.



याप्रसंगी महापौर मुक्ता टिळक, उपमहापौर डॉ. सिद्धार्थ धेंडे, आमदार जगदीश मुळीक, महापालिका आयुक्त सौरभ राव, माजी आयुक्त कुणाल कुमार, मुकुल माधव फाउंडेशनचे अध्यक्ष प्रकाश छाब्रिया, व्यवस्थापकीय विश्वस्त रितू छाब्रिया, सभागृहनेते श्रीनाथ भिमाले, स्थायी समितीचे अध्यक्ष योगेश मुळीक, डॉ. अंजली साबणे, नगरसेविका अर्चना पाटील, नगरसेवक अविनाश बागवे आदी उपस्थित होते.

बापट म्हणाले, योग्य आणि वेळेत उपचार न मिळाल्यामुळे नवजात अर्भकांचा मृत्यू होतो. आर्थिक परिस्थिती नसलेले सर्वसामान्य लोक दवाखान्यात भरण्यास पैसे नसल्यामुळे दवाखान्यात येण्यास घाबरतात. परिणामी गर्भवती स्त्री किंवा नवजात अर्भकाला उपचाराअभावी मृत्यूला सामोरे जावे लागत होते. योग्य उपचार न मिळाल्यामुळे वर्षाला सहा हजार बालकांचा मृत्यू होत होता. अलीकडे हेच प्रमाण अडीच हजारांवर आले आहे, असे त्यांनी सांगितले.